सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

Email ID :- ramesh.sarfare74@nic.in


क्र.:- निर्लेखन-२०१९/प्र.क्र. १३ /गृहव्य दिनांक:- १७ एप्रिल २०२५

प्रति,

संचालक,
माहीती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई

**विषय: निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.**

महोदय,

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील नादुरुस्त/कालबाह्य झालेल्या संगणक सामुग्रीची (भंगार) पद्धतीने विक्री करावयाची आहे. याबाबत निविदा सूचना सोबत जोडली आहे. सदर निविदा सूचना शासनाच्या संकेतस्थळावरुन प्रसिध्द करण्यात यावी. ही विनंती.

आपला,

(र. वा. सरफरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती कार्या. गृहव्य

SCANit

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

Email ID :- ramesh.sarfare74@nic.in


**क्र.:- निर्लेखन-२०१९/प्र.क्र. १३ /गृहव्य** **दिनांक :-१७ एप्रिल २०२५**

## निविदा सूचना

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई येथील नादुरुस्त व कालबाह्य झालेल्या संगणक सामुग्रीची विक्री करायाची आहे. त्याकरीता मोहोरबंद निविदा मागवित आहोत. तरी, इच्छूक निविदाधारकांनी निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन निविदा सूचनेसोबत जोडलेल्या निविदा फॉर्ममधील विवरणपत्रात दर नमूद करुन **निविदा बंद लिफाफ्यात कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन क्र. गृहव्य) मंत्रालय, विस्तार इमारत, ६ वा मजला, रुम नं. ६१२, मुंबई यांच्याकडे दि. १७.०४.२०२५ ते दि.२४.०४.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत जमा करावेत.** त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत.

४. **प्राप्त निविदा उप सचिव ( कार्या. गृहव्य ) यांनी दिलेल्या तारखेस व वेळेला उप सचिव , कार्या. गृहव्य यांच्या दालनात उघडण्यात येतील.** निविदाधारकांना निविदा उघडण्याची तारीख व वेळ पत्राद्वारे / फोनद्वारे कळविण्यात येईल. निविदा मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वतः किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल. (मंत्रालय प्रवेश नियमानुसार)

**नादुरुस्त/कालबाह्य झालेल्या संगणक सामुग्रीची विक्री करण्यासाठी निविदेबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-**

१. निविदा सूचनेसोबत जोडलेल्या यादीनुसार विभागातील नादुरुस्त ऑल एन वन संगणक, मॉनीटर, सीपीयु, झेरॉक्स कम प्रिंटर मशिन, प्रिंटर, स्कॅनर, इ. निविदा पध्दतीने जेथे आहे व जसे आहे तसे विक्री करणे आहे.

२. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्यांनी निविदा सूचनेसोबत जोडलेल्या निविदा फॉर्ममधील विवरणपत्रात दर नमूद करुन निविदा बंद लिफाफ्यात कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन क्र. २४) मंत्रालय, विस्तार इमारत, ६ वा मजला, रुम नं. ६१२, मुंबई यांच्याकडे दि. १७.०४.२०२५ ते दि.२४.०४.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

३. अनामत रक्कम रुपये ५००/- (ना परतावा) अवर सचिव, रोख शाखा, सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२ यांच्याकडे जमा करावी.

४. सदर विक्री ही निविदा पध्दतीने करण्यात येणार असल्याने बंद लिफाप्यावर " नादुरुस्त/कालबाह्य संगणक, प्रिंटर्स व स्कॅनर खरेदीसाठी निविदा " असे स्पष्ट नमुद करावे तसेच लिफाफ्यावर निविदा सादर करणा-याचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक नमूद करुन निविदा सादर करावी.

५. सदर निविदेसोबत निविदाधारकाचे पॅनकार्ड/ आधार कार्ड इ. ओळखीचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. तसेच, Electronic साहित्य खरेदी करण्यासाठीचे e-Certificate खरेदीदाराकडे असणे आवश्यक आहे.

६. अनामत रक्कम भरल्यानंतर अवर सचिव, रोख शाखा, सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२ यांच्याकडून प्राप्त झालेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, अनामन रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

७. निविदा उघडण्याच्या विहित वेळेस संबधित निविदाधारकास/प्रतिनिधीस व्यक्तीशः उपस्थित रहाता येईल, तसेच उपस्थिती नसल्यास सदर निविदा उपस्थित निविदाकार/प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील व त्याबाबत अनुउपस्थित निविदाधारकाची कोणतीही तक्रार चालणार नाही .

८. यशस्वी निविदाधारकास मंजूर निविदा रक्कमेतुन अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम कार्यालयीन पाच दिवसात भरणा करुन साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची निविदा रद्दबातल ठरवली जाईल व अनामत रक्कमेस त्यास मुकावे लागेल.

९. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर तात्काळ सदर वस्तु आहे त्या ठिकाणाहुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही. तसेच निविदा मंजूरी नंतर सदर वस्तुची जबाबदारी निविदाधारकाची राहील,

१०. सदर वस्तु वाहतुक करताना/ताब्यात घेताना आवश्क असलेले शुल्क /कराचा भरणा, अनुषंगीक खर्चाची संपूर्ण जबाबदारी यशस्वी निविदाधारकाची राहील.

११. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

१२. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट स्विकारली जाणार नाही.

१३. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर नाकारणे याचे संपुर्ण अधिकार शासनाने राखुन ठेवलेले आहेत.

१४. यशस्वी निविदाधारकाने वस्तु ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याबाबत मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई द्यावी लागेल.

१५. निर्लेखित केलेले संगणक हे शासकीय कार्यालयातील शासकीय कामकाजाशी संबधित आहेत. त्यामुळे त्यात काही डाटा हार्डडिस्क मध्ये असल्यास तो पुर्णपणे काढुन टाकाण्याची जबाबदारी खरेदीदार निविदाधारकाची राहील.

(र.वा.सरफरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**दिनांक:- १७ एप्रिल २०२५**
**ठिकाण:- मुंबई**

# विक्री करावयाच्या साहित्याची यादी

| अ.क्र | साहित्य | नग |
|---|---|---|
| १. | ऑल ईन वन संगणक | १० |
| २. | मॉनीटर | ३९ |
| ३. | सीपीयु | ३३ |
| ४. | झेरॉक्स कम प्रिंटर मशिन | ३३ |
| ५. | प्रिंटर | ३६ |
| ६. | स्कॅनर | ३ |
| ७. | झेरॉक्स मशिन | १ |
| ८. | रिकामे टोनर | १०० |
| ९. | की- बोर्ड | उपलब्धतेनुसार |
| १०. | माऊस | उपलब्धतेनुसार |

( विक्री करावयाच्या साहित्यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.)

SCANit

# निविदा फॉर्म

दिनांक:- १७ एप्रिल २०२५

प्रति,
कक्ष अधिकारी (का. गृहव्य)
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय दालन क्र.६१२ (विस्तार),
६ वा मजला मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

**विषय:-** निर्लेखित केलेल्या संगणक, प्रिंटर्स, स्कॅनर इ. संगणकीय साहित्याच्या खरेदीबाबत.

महोदय,

आपली निविदा सुचना निर्लेखन-२०१९/प्र.क्र. १३/गृहव्य च्या संदर्भात शासनाच्या संकेतस्थाळावर दिलेल्या दि.१७.०४.२०२५ च्या जाहिराती अनुसार साहित्य आहे त्या स्थितीत मी लिलिवामध्ये भाग घेऊ इच्छितो आहे. या प्रक्रियेकरिता निविदा सूचनेमध्ये लागू सर्व नियम, अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**<u>निविदा दर पत्रक</u>**

| अ.क्र. | साहित्य | नग | किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ऑल ईन वन संगणक | ०१ | |
| २ | मॉनीटर | ०१ | |
| ३ | सीपीयु | ०१ | |
| ४ | झेरॉक्स कम प्रिंटर मशिन | ०१ | |
| ५ | प्रिंटर | ०१ | |
| ६ | स्कॅनर | ०१ | |
| ७ | झेरॉक्स मशिन | ०१ | |
| ८ | रिकामे टोनर | ०१ | |
| ९ | की- बोर्ड | ०१ | |
| १० | माऊस | ०१ | |

निविदा सादर करणाऱ्याचे नाव :-
पत्ता:-
स्वाक्षरी:-
दुरध्वनी क्र:.

SCANit